


# परिमळ

BMM
25th ANNIVERSARY
॥ तयाचा वेलू गेला गगनावरी ॥
12th Convention
Atlanta 2005 Georgia



बृहन्महाराष्ट्र मंडळाची रौप्यमहोत्सवी स्मरणिका

1981 - 2005

# बृहन्महाराष्ट्र मंडळ ....
# सुरुवात आणि विकास

**जयश्री हुपरीकर**

बृहन्महाराष्ट्रवृत्त : वर्ष पहिले, अंक पहिला... पंचवीस वर्षापूर्वी जानेवारी महिन्यात शिकागोतून पाठवला गेला. त्याच्यामागे होते बृहन्महाराष्ट्र मंडळाचे संस्थापक, श्री. विष्णु वैद्य, श्री. शरद गोडबोले आणि मी जयश्री हुपरीकर. १९८० साल आम्हा तिघांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे ! त्या वर्षात बृहन्महाराष्ट्र मंडळाची पायाभरणी झाली. जवळजवळ शंभर एक जणांशी श्री. शरद गोडबोले त्यावर्षी बोलले असतील. अनेकांचे पडसाद गोळा केल्यानंतर त्यावर्षी मंडळ सुरु करण्याचे ठरवले. आमच्याजवळ शिकागोच्या महाराष्ट्र मंडळाचा अनुभव होता. त्याच्या स्थापनेपासून मी आणि शरद त्यात गुंतलेलो होतो. श्री. विष्णु वैद्य आमच्यानंतर शिकागोत आल्याने स्थापनेच्या वेळी जरी ते नसले तरी आगमन करताच ते जोमाने मंडळाचे कार्यकर्ते झाले. बृहन्महाराष्ट्र मंडळाची मूळ कल्पना त्यांचीच होती, त्याला मूर्त स्वरुप देण्याचे स्वप्न आमच्या तिघांचे ! महाराष्ट्र मंडळाच्या 'रचना' मुखपत्राची रचना काहीजणांच्या मदतीने प्रामुख्याने मीच केली होती, आणि त्याची उपयुक्तता सिद्ध झाली होती. म्हणूनच बृहन्महाराष्ट्र मंडळाचे देखील मुखपत्र असावे असं आम्ही ठरवले. त्यावेळी इंटरनेट किंवा कंप्युटर घरोघरी आला नव्हता. भारतीय (इंग्लिश) बातमीपत्रे अनेक होती पण त्यात मराठी मनाला हव्या असलेल्या बातम्यांचा अभाव होता. आम्हाला पु.लं.चं नवीन काय चाललंय, नवी नाटकं काय गाजतायत, नवी पुस्तके, संगीत, कला वगैरे संदर्भ हवे असत. ते मात्र कुठेच मिळत नसत. हे लक्षात घेऊन आम्ही महाराष्ट्रातील बातम्या देणारे पत्रक सुरु करण्याचे ठरवले. तसं करताना अमेरिकेतील मराठी लोकांच्या बातम्या प्रामुख्याने देण्याचंही ठरवलं. मनात होतं की पत्रकाद्वारे अमेरिकेतील मराठी लोकांचा संवाद घडावा. त्यांच्यात जवळीक साधली जावी. एकत्रित होऊन मराठी बलस्थान निर्माण व्हावे. मंडळाचा हेतूही तोच होता. 'तिळातिळाने वाढावा भावनांचा एक दुवा। दुरावल्या जीवनाचा बांध नव्याने जुळावा ।।' अशा भावनेतून सुरुवात झालेली !

वाचकांच्या उत्स्फूर्त देणग्यांवर वृत्त विसंबून होते. जिथे कमी पडेल तिथं आम्ही तिघं ! आठ-दहा हजार मराठी लोक अमेरिकेत असावेत असा अंदाज होता. त्यामानाने वृत्ताला प्रतिसाद तितपतच होता. पण आमची आशा जबरदस्त ! तीन वर्षे वृत्त चालवीत असतानाच अधिवेशनाची कल्पना डोकावली. कन्नड, तामिळ, गुजराथी भाषिकांची संमेलने पहात होतो. हजारोंनी लोक हजर होते. वाटलं, मराठी लोकांचंही करुन पहावं. अनिता (सौ. गोडबोले), प्रभा (सौ. वैद्य) व शंकर हुपरीकर या तिघांनीही आम्हाला वेड्यातच काढलं. कुणीही येणार नाही, अधिवेशन करु नका, असंही त्यांनी सांगितलं. पण आम्ही वाचकांचा प्रतिसाद अजमावत होतो. जरी भरघोस नसला तरी अधिवेशनाचा घाट घालण्यापुरता तो आहे. असं आम्हाला वाटलं. प्रतिसादाला मान देऊन अधिवेशन सुटीला जोडून न करता विकेन्डला करायचं ठरवलं. मार्च ८३ पासून सुरुवात करुन जुलै ८४ मध्ये अधिवेशन पक्के केले. सगळंच अनमान धक्क्याने करायचं होतं. लोक निश्चित काहीच सांगत नव्हते. पुण्याच्या मुकुंदराव किर्लोस्करांच्या मदतीने त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांकडून बालकलाकार आनंदगंधर्व (भाटे) याच्यासाठी मदत मिळवण्यात मला यश आलं. त्यावेळी संरक्षण मंत्री असलेले श्री. शंकरराव चव्हाण यांनी प्रमुख पाहुण्याचे आमंत्रण स्वीकारले होते. आम्हाला जे निश्चित करता येण्याजोगे होते ते आम्ही केलंच होतं. खरं म्हणजे शिकागोत दरवर्षी नाटक करीत असूनही अधिवेशनात आमचं नाटक ठेवता आलं नाही. कारण अधिवेशनाची कामं करायला दुसरं कोण होतं ? वाईट इतकंच वाटतं की त्यानंतर अकरा अधिवेशनात विनंती करुन देखील आमच्या नाटकाला संधी मिळाली नाही. वाढत राजकारण प्रत्येकवेळी आड आलं. लक्ष्मण देशपांडे यांचे 'वऱ्हाड चाललंय लंडनला' व द.मा. मिरासदारांचे कथाकथन हे दोन कार्यक्रम ठरवले होते. आमची तिन्ही कुटुंब घरातल्या कार्यासारखी या अधिवेशनासाठी सतत राबत होती. जागा केवढी घ्यावी हाही महत्त्वाचा मुद्दा होता. सगळा खर्च आमच्यावर पडण्याची शक्यता मनात ठेवून योग्य ती जागा घेतली. प्रसिद्धी माध्यम फक्त 'वृत्त' आणि 'एकता' ! ठिकठिकाणच्या महाराष्ट्र मंडळांकडे पत्रके पाठवून प्रसिद्धी देण्याची विनंती केली होती.

मार्च ८४ पर्यंत अधिवेशनाचे दोन दिवसांचे कार्यक्रम ठरवले. विविध विषयांवर परिसंवाद ठेवले होते. त्याची पूर्वतयारी आखून ठेवली. त्यासाठी काही लोकांना निमंत्रित केले. प्रवेश शुल्क होतं केवळ २५ डॉलर्स ! (विश्वास बसतोय ?) जेवणाचे वेगळे ! राहण्याची सोय स्थानिक लोकांच्या घरी ! म्हणजे पुन्हा आम्हालाच ते आखायचे होते. सगळी धावपळ करुन तयारी तर केली होती. वृत्तात निमंत्रणही दिलं होतं. 'ही मराठीची हाक, आईच्या मायेची। जुळवुनी आणा तुम्ही भेट सकळांची ।।' आणि पहिलं-वहिलं अधिवेशन पार पडलं ! उद्योजकांचही संमेलन दोन दिवस होतं. परिसंवाद गाजले. आनंदगंधर्वचे अनेक कार्यक्रम जागोजागी झाले. महाराष्ट्र फाऊंडेशनचे संस्थापक कै.द. कानिटकरांचे निवेदन अत्यंत हृदयस्पर्शी ठरले. आलेल्या प्रत्येकाला तीन दिवसांची आगळी भेट स्मरणीय ठरली. निरोपाच्या वेळी नकळत भरुन येत होतं. टोरांटोकरांनी पुढील अधिवेशनाचे निमंत्रण करुन जणू पसंतीची पावतीच दिली असं आम्हाला वाटलं. एक अभिनव प्रयोग आम्ही केला होता. लोकांना तो आवडला होता. आमच्या तिन्ही कुटुंबांच्या परिश्रमांचे चीज झाल्यासारखे आम्हाला वाटले. एका वेगळ्याच समाधानाने व त्यामुळे अधिक उत्साहाने कामाला चालना देऊ लागलो. वृत्तपत्रदेखील जवळजवळ स्वावलंबी झाले. एक प्रकारची स्थिरता येईल अशी



आशा निर्माण झाली. अथक प्रयत्नांनंतर मार्च ८५च्या अंकात पहिल्यांदा महाराष्ट्रातील बातम्या पुण्याहून संकलीत केलेल्या होत्या. श्री. मुकुंदराव किर्लोस्कर, राजेंद्र हिर्लेकर, प्रकाश जोशी आणि वामनराव जेरे यांच्या सहाय्याने ही गोष्ट घडली. त्यामुळे अमेरिकेतील बातम्या देण्यास अधिक जागा उपलब्ध झाली.

टोरांटोच्या अधिवेशनाची तयारी सुरु झाली होती. बहुतेक आखणी पहिल्या अधिवेशनासारखीच होती. मात्र राहाण्याची सोय स्थानिकांच्याच घरी मर्यादित न ठेवता हॉटेल्सचीही विचारणा त्यांनी केली होती. त्या अधिवेशनला सुमारे ८०० उपस्थितांनी मराठीवरील प्रेम व्यक्त केले. तितक्याच लोकांना बृहन्महाराष्ट्र मंडळाविषयी माहिती करुन देण्याची आम्हाला संधी मिळाली. त्याचवेळी अनेकांनी मंडळात काम करण्याची, वृत्ताचे काम करण्याची इच्छा व्यक्त केली. आम्हाला स्वयंसेवक हवेच होते. मराठी लोकांची युती साधायला जितके हात मिळतील तितके हवेच होते. ते काम सगळ्यांचे, सगळ्यांसाठी आणि सगळ्यांनी मिळून करायचे होते. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे उद्दिष्ट्य साधण्यास आता हवे ते पाठबळ मिळाले होते. बृहन्महाराष्ट्र मंडळाची दिशा व कार्य ठरविण्याची हीच वेळ होती. ते आता आम्हां तिघांपुरतंच न ठेवता देशव्यापी करावं असंही अनेकांचं मत दिसलं. त्या दृष्टीने विचारमाला सुरु झाली. टोरांटोच्या अधिवेशनात दर दोन वर्षांनी अधिवेशन भरवावं असं बोललं गेलं व पुढील अधिवेशन न्यूयॉर्क, न्यूजर्सी परिसरात ४ जुलैच्या आसपास करायचे ठरवण्यात आले.

१९८६ हे वर्ष आम्हा तिघांचे पुन्हा एकदा जिकीरीचे गेले. काही लोकांना बृहन्महाराष्ट्र मंडळाचे काम करण्याची अतिशय घाई लागली होती. आम्ही त्यांच्यावर सोपवून द्यावे अशी त्यांची इच्छा होती. पण आम्हाला ते काम चालू राहील याची खात्री पटत नव्हती. ती जेव्हा पटली, वृत्तासाठी मराठी 'फॉन्ट'ही जेव्हा मिळाला, तेव्हा आम्ही तिसऱ्या अधिवेशनानंतर खांदेपालट करायची असं ठरवलं. एव्हाना मराठी लोकांची संख्या वाढली होती. कंप्युटर घरोघरी येत होते. कामाचा पसारा वाढला तशी मदतीची साधनेही उपलब्ध होत होती. श्री. श्रीराम मुळगुंद यांच्या अध्यक्षतेखाली बृहन्महाराष्ट्र मंडळाची नवी कार्यकारिणी जानेवारी ८७ पासून कार्यान्वित झाली. आमची तिघांची नावं संस्थापक म्हणून झळकू लागली. तीही नव्या संपादक मंडळाने दुसऱ्या अंकातच पुसून टाकली. पर्यायाने 'नवी विटी नवं राज्य' तेथूनच जे सुरु झालं, ते आम्हाला न सांगता सवरता बदलत गेलं. राज्य मिळताच ज्याचे त्याचे नवे प्रयोग सुरु होत गेले. प्रत्येकजण मागच्यावर टीका करुन आपलंच घोडं पुढे दामटायला लागला. त्यामुळे बृहन्महाराष्ट्र मंडळाची वृद्धी त्यात झाली नाही. अपुरं राहिलेलं काम पुरं केलं गेलं नाही. वृत्त चालू राहीलं, पण विस्तारलं नाही. आम्हाला अभिप्रेत असलेला सुसंवाद त्याने साधला नाही. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे प्रमुख कार्य अधिवेशन ठरलं. कार्यकर्त्यांना फक्त तेच करता आलं. त्यातही चढाओढीमुळे त्यातील आपुलकी, जिव्हाळा नाहीसा झाला. कार्यकर्ते प्रचंड मेहनत घेऊन मागच्यापेक्षा उत्तम करण्याच्या इराद्याने काम करत असले तरी कित्येकदा कार्यकर्त्यांना बृहन्महाराष्ट्र मंडळाची पुरेशी माहितीही नसावी असा अनुभव आला, जेव्हा आम्हाला आमची ओळख सांगावी लागली. अधिवेशन बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे होत असते, याचाही अनेकदा विसर पडलेला जाणवला. अधिवेशनाची उपस्थिती प्रत्येकवेळी वाढत होती. popularity निश्चितच मोठी होती. त्याचं स्वरुप अजूनही पहिल्या अधिवेशनासारखंच असतं. यावरुन आम्ही आखलेली योजना किती योग्य होती, याची वेळोवेळी प्रचिती येते. बदल झालाय तो सादरीकरणामध्ये. थाटमाट वाढला (झेपत असेल तर तोही करावा) आपुलकी मंदावली, अगत्य नाहीसं झालं. थोडक्यात संमेलन न होता एखादं अमेरिकन convention, business सारखं वाटायला लागलं. त्यातलं मराठीपण हरवलं. जेव्हा प्रमुख पाहुण्यांना 'तुमची वेळ संपली' अशा चिठ्ठ्या कार्यकर्ते पाठवून त्यांचा अवमान करतात, त्यावेळी मनात अस्वस्थता दाटते. जेव्हा अधिवेशनासाठी महाराष्ट्र सरकारकडून मदत घेतली जाते, तेव्हा लाजेने मान खाली होते. मग ती मदत परत केली तरी कृतीतील अयोग्यता नाहिशी होत नाही. उगीच अधिवेशनं सुरु केली असं मनात येऊन जातं. सुदैवाने श्री. विष्णु वैद्य ते पहायला जगातच नव्हते. नाहीतर त्यांना किती यातना झाल्या असत्या ! थोडक्यात बृहन्महाराष्ट्र मंडळ व्यावसायिक बनत चालले. मात्र वृत्ताची आर्थिक स्थिती तितपतच आहे. अजूनही वार्षिक अंक काढणे हे आर्थिकदृष्ट्या सहजशक्य नाही. (गेली दोन वर्षे मला याचा अनुभव आला.) याचं कारण काय असावं याची निश्चित कल्पना नसली तरी अधिवेशनातून त्यासाठी तजवीज केली जात नाही, याचे आश्चर्य वाटते. वर्गणीदारही वाढत नाहीत. त्यासाठी पुरेसे प्रयत्न करायला हवेत. मुख्य म्हणजे वृत्ताची निश्चित भूमिका, त्याचे स्थान व त्याची गरज पुन्हा एकदा अजमावण्याची वेळ आली आहे, असं मला वाटतं. खरं म्हणजे आम्ही एकदा खांदेपालट केल्यानंतर मंडळाच्या कुठल्याही निर्णयात आम्हाला मत नव्हतं. आम्ही नाकही खुपसलं नाही. आम्हाला कुणी विचारलंही नाही. त्यामुळं अंदरकी बात आम्हाला मुळीच माहीत नाही. अधिवेशनात जे काय जाणवत असे तेच अनुभव आमच्यापुरते ! आमच्या तिघांमधे श्री. वैद्य आजारी पडेपर्यंत (२००१) प्रत्येक अधिवेशनाला हजर होते. बृहन्महाराष्ट्र मंडळाची आर्थिक स्थिती उत्तम नसल्याने अधिवेशनाच्या बाबतीत त्यांच्या मताला फारसा वाव नसतो. त्यामुळे त्या त्या अधिवेशनांची वेगळी कार्यकारिणी 'सर्वेसर्वा' बनून जाते असं त्यांचं मत होते. इतक्या वर्षाच्या अनुभवानंतर त्याची प्रचीती पटली. त्यात बदल करण्याचाही श्री. वैद्यांनी प्रयत्न करुन पाहिला. पण त्यांना यश आलं नाही.

वैयक्तिक पातळीवर मराठी माणसांची अमेरिकेतील प्रगती अभिमानास्पद आहे. सतरा भारतीय निवडणूक विजेत्यांपैकी दोघंजण मराठी आहेत. कुमार बर्वे व स्वाती दांडेकर. दर अधिवेशनात मंडळातर्फे अनेकांचा सन्मान करण्यात येतो. फक्त त्या कार्यक्रमाला द्यायला हवे तितके प्रमुख स्थान देण्यात न आल्याने बहुतेकांना त्याची कल्पनाच नसते. अकरा अधिवेशनं झाली. तितकेच अध्यक्ष निवडून आले. पण मागील सूत्रावरुन पुढे मंडळ गेले नाही. कारण प्रत्येकाने स्वत:चे राजकारण चालवले. दरम्यान 'मैत्र' ही युवकांची संघटना, त्यांच्या वेगळ्या अधिवेशनापुरती निर्माण झाली. सुरुवातीचा त्यांचा उत्साह अजून टिकल्यासारखा वाटत नाही. पण ती कल्पना मोठी उत्साहवर्धक,

प्रगतीची होती. मंडळ त्यांच्यातूनच वाढेल अशी आशा मनात उत्पन्न झालीदेखील ... पण ... ?

'तयाचा वेलू गेला गगनावरी' या ब्रीदवाक्याला साक्षी ठेवून अटलांटामधे बारावे अधिवेशन भरत आहे. वैयक्तिक प्रगती आणि अधिवेशनांची वाढती उपस्थिती पहाता, शब्दार्थानं हे ब्रीदवाक्य योग्य वाटत असलं तरी त्यातील वैश्विक, अध्यात्मिक गूढार्थ सार्थ करायला आपल्या सगळ्यांना अजून कितीतरी साधायला हवंय, शिकायला हवंय, याचं भान आपल्याला असलं की सारं मिळालं. अटलांटाची मराठी मंडळी अगदी कंबर कसून कामाला लागली आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्यामुळे अधिवेशनाचे महत्व अधिक वाढलं आहे. त्यांना मनापासून शुभेच्छा ! हा लेख लिहिण्याची संधी दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद !

त्यानिमित्त बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या दिवंगत संस्थापकांना भावांजली अर्पण :

बीज पेरुन रोपटे, जनी आनंदी वाढावे

झाले निर्वाण तरीही, कार्यरुपी की उरावे !

# श्री. विष्णु वैद्य,

## १९३५-२००१



इंडस्ट्रीयल इंजिनियरची पदवी घेतल्यानंतर त्यांनी भारतात टेल्को कंपनीत काही वर्षे नोकरी केली आणि ७१ साली त्यांचे कुटुंब शिकागोच्या मराठी समाजात गोवले गेले. मग संडे स्कूल असो की वाढदिवस असो, श्री वैद्यांचा उत्साह दांडगा, स्वभाव मोकळा, वागण्यात प्रसन्नता, चेहऱ्यावर हसरे भाव, जरा मोठ्याने बोलण्याची सवय. ते साहित्य, संगीत, कलाप्रेमी होते. पाठांतर दांडगे. संभाषणातून अनेकदा सुभाषिते वा काव्यपंक्ती ते फेकत असत. मंडळाच्या नाटकातूनही त्यांनी कामं केली होती. मंडळाच्या सगळ्या कार्यक्रमात वैद्य मनापासून सहभाग घेत असत. जनसंपर्क त्यांना अतिशय आवडता. त्यामुळे त्यांचा लोकसंग्रह फार मोठा होता. समाजातील गुणी लोकांचा, विद्वानांचा आदर करण्याची त्यांची वृत्ती वाखाणण्याजोगी! सगळ्यांसाठी मदतीला धावून जात असत. सतत काहीतरी केले पाहिजे असे त्यांना वाटत असे. त्यामुळे मला आठवतं की काही वर्षे ते एकाचवेळी हिंदू टेंपल, FIA, IDS, BMM या सगळ्या संस्थांतून काम करीत होते. त्यासाठी त्यांना इतके driving करावे लागे. पण त्यांना त्याचे काही वाटत नसे. शिवाय MBA, पूर्णवेळ नोकरी चालू होतीच.

'कल्पकतेपुढती जिथे गगन ठेंगणे' असे श्री. वैद्यांच्याबाबतीत म्हणावेसे वाटते. ते बुद्धीने कुशाग्र, उद्यमशील, उद्योजक, कल्पक, ध्येयवादी आणि योजक होते. त्यांनी अनेक व्यवसाय यशस्वीपणे हाताळले. महाराष्ट्रातील उद्योगधंद्याला इथून सहाय्य करण्याचे त्यांनी अविरत प्रयत्न केले. शेवटी शेवटी अनेक वर्षांच्या नोकरीतून बाहेर पडल्यावर त्यांनी स्वतंत्रपणे वेगळाच व्यवसाय Personal Financial Planning सुरु केला होता. शिवाय भारतात कंप्युटरच्या व्यवसायात पडण्याच्या कल्पनेने, त्या दृष्टीने त्यांनी कोर्सेसही केले होते. ही नाविन्याची आवड म्हणायची की महत्वाकांक्षा की उद्यमशीलता ? त्यांच्या धडपडीने भोवतीचे इतर जण दमून जायचे.

त्यांच्या डोक्यात इतक्या कल्पना घोळत असत की त्या शब्दात उतरण्याचा वेग कमी पडे, त्यामुळे कितीही भराभर बोलले तरी सगळे सांगताना त्यांची गडबड उडत असे. आणि म्हणूनच की काय, सर्व कल्पना, उद्देश व कार्यवाही संपूर्ण आराखड्यासकट ते लिहून काढीत असत. सर्व विचारपूर्वक ठरवून पुढे मांडण्याची सुसूत्रता पदोपदी दिसून येत असे. त्याचबरोबर सहकाऱ्यांच्या मतांना डावलण्याचा हेकेखोरपणा त्यांनी कधीही दाखवला नाही.

शिकागोच्या महाराष्ट्र मंडळाच्या इतिहासात कार्यकारिणीची निवडणूक पहिल्यांदा झाली ती १९७७ साली आणि श्री. वैद्य अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्याआधी नियुक्ती होत असे. त्यावेळी त्यांची संपूर्ण कार्यकारिणी नावानिशी लेखी तयार होती. तेव्हापासून मंडळाची संपूर्ण कार्यकारिणी दरवर्षी आधीपासून तयार करण्याची प्रथा पडली. नाहीतर ऐनवेळी शोधाशोध केली जात असे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाची मूळ कल्पना श्री. वैद्यांची. त्याला मूर्त स्वरुप आम्ही तिघांनी दिले. कार्यवाही तिन्ही कुटुंबाच्या सहाय्याने झाली. सगळ्यांनीच खूप मेहनत घेतली तेव्हा आजची अधिवेशने अनुभवता येत आहेत. श्री. वैद्य त्यांच्या स्वभावानुरुप मंडळाची चिंता करत असत. सतत आहे त्यापेक्षा अधिक कृतीशील कसे होता येईल, या विचारात ते असत. त्यांना गावोगावी मराठी प्रवाशांसाठी घरगुती निवासस्थाने सुरु करायची होती. त्यांच्यामते हॉटेलपेक्षा ते अधिक सुखाचे होईल. पण ती कल्पना कुणीच उचलून घेतली नाही. म्हणून प्रत्यक्षात आली नाही. अजूनही मंडळात काय नवे करावे याचे विचार त्यांच्या डोक्यात सतत चालत असत. मधून मधून ते बोलूनही दाखवत असत. आमच्यापैकी कुणीतरी पुन्हा मंडळाचे काम करावे. असंही त्यांना वाटत असे. आयुष्य त्यांनी रसिकतेने, कर्मभावाने घालवले. कुठल्याही संकटाने खचून न जाता त्यातून पुढे जाण्याचे सतत प्रयत्न करीत राहिले.

अशा खळाळत्या, उत्साहीत व्यक्तिमत्वाला कर्करोगाची झळ लागली. तरीही त्यांची तत्परता कमी झाली नाही. दुसऱ्याबद्दल आपुलकी कमी झाली नाही. वर्षभर सामना चालला होता. आम्हा सगळ्यांच्या सदिच्छा, सगळ्यांच्या प्रार्थना अपुऱ्या पडल्या आणि विष्णु वैद्य काहीही न बोलता, न सांगता आपल्यातून निघून गले... (२६ ऑगस्ट, २००१) उरल्यात फक्त पाऊलखुणा ... कित्येकांना मार्गदर्शक, कृतीदर्शक, स्फूर्तिदायक !

# श्री. शरद गोडबोले,

## १९३०-२००४



१९६६ साली मी भारतातून शिकागोला आले ती दोन मराठी व्यक्तींचे पत्ते घेऊन ! वेदान्त सोसायटीच्या स्वामी भाष्यनंदांचा आणि शरद गोडबोलेंचा ! स्वामींना भेटायला आम्ही दोघं गेलो तेव्हा स्वामीजींनीही सांगितलं, 'शरदला फोन करा, काहीही लागलं तर !' तेव्हापासून आमची जी मैत्री झाली ती आजतागायत ! अमेरिकेत रुळायला शरद व अनीता गोडबोलेंची आमच्यासारखीच अनेक नवविवाहित मराठी लोकांना मदत झालीये. त्यावेळच्या कितीतरी मराठी अविवाहित विद्यार्थ्यांना गोडबोलेंचे घर म्हणजे माहेरघर झाले होते. सगळ्यांना आणापोहोचवा या सगळ्या म्हारक्या शरद हसतमुखाने करीत असत. त्यावेळी मराठी मंडळ अस्तित्वात नसताना शरद मूठभर मराठी लोकांना एकत्र करुन दिवाळी वा सहल असे कार्यक्रम मेहनत घेऊन आखीत असत. ते वेदान्त सोसायटीत देखील काम करत असत. त्यांचा कामाचा उरक आणि उत्साह आश्चर्यकारक होता. इच्छा असेल तर काहीही करता येतं अशी त्यांची ठाम श्रद्धा होती. त्याच्याच बळावर व अनेकांच्या सहकार्यानं शिकागोचं महाराष्ट्र मंडळ (१९७०) व नंतर बृहन्महाराष्ट्र मंडळ (१९८०) कार्यान्वित होऊ शकलं. दोन्ही मंडळात ते सतत कार्यमग्न असत. जे पडेल ते काम करण्याची त्यांची तयारी असे. त्यासाठी कित्येकदा हजारो मैलांचं ड्रायव्हिंगही त्यांनी केलेलं आहे. मंडळाच्या कार्यक्रमाची ध्वनिव्यवस्था अनेक वर्ष ते सांभाळीत होते. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमाला त्यांना ती सारी यंत्रणा घेऊन तासन् तास आधी जावं लागत असे. कुठलाही कार्यक्रम त्यांना एका जागी बसून पाहता आलेला नाही कारण माइक वरखाली करण्याची जबाबदारी त्यांचीच झाली होती. मंडळात येणारे अनेक पाहुणे त्यांचा पाहुणचार घेत होते - कित्येक वर्षे ! त्यांना तंत्रज्ञान, कंप्युटर यामधे विशेष रस होता. आमच्या मित्रपरिवारात पहिला PC शरदने घेतला होता. मराठी font software देखील त्यांनी शिकागो परिसरात सर्वप्रथम आणलं. इतकी वर्षे अमेरिकेत (६१ सालापासून) असून शरद संपूर्णत: शाकाहारी होते व त्यांनी मद्याला स्पर्श केला नव्हता. अनेकजण त्यांची टिंगलही करीत पण त्यांनी त्यांच्या सवयी कुणावरही लादल्या नाहीत. अगदी पत्नीवरही! अशा टिंगलींना ते हसत परतवीत. न चिडता ! भारत investment club दहा मराठी कुटुंबांनी सत्तर साली स्थापन केल्यावर त्यांनी इतर अनेक क्लबस् सुरु करण्यास मदत केली होती. त्याशिवाय विश्व हिंदू परिषद, राष्ट्र सेवा संघ या संघटनांमधे ते प्रामुख्याने भाग घेत असत. लहान मुलांच्या संस्कृती केंद्रासाठीदेखील शरदने काम केले आहे. संघपरिवारात ते स्वत:ला झोकून देत असत.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पहिलं अधिवेशन (१९८४) आम्ही तीन कुटुंबांनी घडवून आणलं. ते जरी अध्यक्ष असले तरी कुठलंही काम करायला त्यांची माघार नव्हती. खरं म्हणजे संस्थेला पदाधिकारी हवेत म्हणून दिलेल्या त्या पदव्या होत्या. आम्हा तिघांच्या बाबतीत ! कुठलीही नवी कल्पना त्यांनी विचारपूर्वक राबवली. त्यासाठी लागतील ते कष्ट घेऊन ! प्रसंगी घराकडे दुर्लक्ष होतही असेल पण सर्व आघाड्यांवर स्वार होण्याची त्यांची वृत्ती होती. तीही प्रसन्न मनाने. सतत हसतमुख असलेल्या शरदना चिडून अपशब्द बोलताना आम्ही तरी पाहिलेले नाही. समाजकार्यात येणाऱ्या चांगल्यावाईट अनुभवांचं त्यांनी मोकळ्या मनाने स्वागत केले. न रुचलेल्या गोष्टींना वाचाही फोडली. पण न आवाज चढवता. तोल न ढळू देता पण खंबीर शब्दात !

शरदच्या निधनाने (२० एप्रिल, २००४) बृहन्महाराष्ट्र मंडळाचा एक संस्थापक, दूरदृष्टी असलेला एक समाजसेवक, शिकागो परिसरातील लोकांचा एक भावनिक आधार, एक जवळचा मित्र, एक प्रसन्न, सात्विक व उत्साही व्यक्तिमत्व हरपले.

BMM 25th ANNIVERSARY

॥ तयाचा वेलू गेला गगनावरी ॥

12th Convention

Atlanta ★ 2005 Georgia